Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18849066

# भारतातील केंद्र-राज्य संबंध: घटनात्मक व राजकीय विश्लेषण

**प्रा.राजेंद्र सोनवणे[1]**

**प्रस्तावना**

भारताने संघराज्य पद्धती स्वीकारल्याने केंद्र-.राज्य संबंध अधिक स्पष्ट व सोयीचे होईल असे घटनाकार यांना अपेक्षित होते. राज्यघटना अस्तित्वात आल्यानंतर भारताचे विविध संस्थानांमध्ये व प्रांतांमध्ये विभागणी झाली होती भाषावर प्रांत रचने नंतर भारत आणखी विभागला गेला. एवढा मोठा विस्तृत व्यापक विविधतेने नटलेला भूभाग, प्रदेश एका क्षेत्राखाली आणणे एवढे सोपे कार्य नव्हते व एक केंद्र सत्तेद्वारे त्याचे नियंत्रण व संचालन करणे हे ही सोयीस्कर होणार नाही हे घटनाकारांनी ओळखले होते. त्यानुसार अमेरिका व कॅनडा सारख्या देशाच्या संघराज्याच्या पद्धतीचा अभ्यास केला गेला व त्याही आहेत त्या स्वरुपात न स्वीकारता जे चांगले व आपल्या राष्ट्राला हितकारक व उपयोगी ठरेल अशीच नवीन संशोधित संघराज्य पद्धती स्वीकारली गेली. उदा. अमेरिकेची संघराज्य पद्धती ही अध्यक्ष व केंद्राकर्षी तर भारताची संघराज्य पद्धती लोकशाही केंद्रोत्सारी पद्धतीने स्वीकारली गेली.

**केंद्र-राज्य संबंध आणि संघराज्य:-**

आंतरराष्ट्रीय संबंध, प्रभावी शासन, राष्ट्रीय एकात्मता, राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकास नियोजनबद्ध व व्यवस्थित करण्यासाठी केंद्र-राज्य संबंध सुधारणे आवश्यक आहे. दोघांचे कार्य परस्पर पूरक आहे व ते विरोधी होऊ नये व राज्य-राष्ट्रीय विकासात बाधा निर्माण होऊ नये यासाठी भारतीय घटनेत केंद्र-राज्य संबंध अधिकार विभागणी स्पष्ट करण्यात आली आहे. घटनेनुसार केंद्र, राज्याने कार्य करणे अपेक्षित आहे.केंद्र-राज्य अधिकार विभागणी व वाटणी करताना यावर तत्कालीन परिस्थितीचा प्रभाव आहे त्यानुसार फाळणी नंतर स्वातंत्र्योत्तर काळात हिंदू मुस्लिम दंग्याचे वनवे जागोजागी पेटले होते. अशी परिस्थिती नेहमीच फुटीरतावादी शक्तींना पोषक असते. देशाचे आणखी विघटन होऊ नये असा बंदोबस्त करण्याची निकड संविधानकारांना वाटणे स्वाभाविक होते. या शक्यता-आवश्यकते वरूनच केंद्रीय सत्ता अधिक मजबूत व शक्तिशाली बनत गेली. अत्यंत महत्त्वाच्या व आणीबाणीच्या प्रसंगात संघराज्य हे एकात्मक व अध्यक्षीय स्वरूपाचे करता येईल अशी तरतूद ही घटनाकारांनी करून ठेवली त्यामुळे विविध विचारवंतांनी भारतीय संघराज्य हे निम-संघराज्य, सहकारी संघराज्य, संघराज्य सदृश्य राज्य अशी विविध विशेषणे ठेवली आहेत. भारतीय संघराज्य हे नुसतं नावालाच आहे आशयाने तर ते एकात्म संघराज्य आहे.

**केंद्र-राज्य सबंध अधिकार विभागणी**

[1] राज्यशास्त्र विभाग, र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई.

सातवी अनुसूची कलम २४५ ते २५५ केंद्र-राज्य संबंधाची विभागणी प्रामुख्याने विधिविषयक, प्रशासकीय व आर्थिक संबंधावर केलेली आहे. संघराज्य वैशिष्ट्ये, तत्त्वानुसार केंद्र सूची मध्ये ९७ विषय आहेत. राज्य सूची ६६, समवर्ती सूची मध्ये ४७ अशी विभागणी कामकाज व समन्वयसाठी करण्यात आलेले आहे. राज्यघटनेच्या सातव्या अनुसूची मध्ये याद्या विस्तृतपणे दिलेले आहेत.

**१.केंद्र सूची**:-

केंद्र सूची मधील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे महत्त्वाचे विषय केंद्राने आपल्याकडे राखून ठेवले आहेत. प्रामुख्याने खालील विषय केंद्र सूचित येतात-

**अ.आंतरराष्ट्रीय संबंध**:- आंतरराष्ट्रीय कायदा, संबंध व धोरणानुसार संघराज्य हेच एक एकक असल्याकारणाने स्वाभाविकच आंतरराष्ट्रीय संबंधाशी निगडित सर्व अधिकार विषय संघ सूचित अंतर्भूत केले आहेत. परराष्ट्र धोरण, राजनैतिक, आर्थिक व्यापार, संयुक्त व्यापार व त्यासारख्या अनेक आंतरराष्ट्रीय संस्था, करारनामे, युद्ध, शांतता, तह, करार, नागरिकत्व, पासपोर्ट, पर्यटन, प्रदेश व्यापार, समुद्रातील व्यापार, करार, आयात निर्यात असा कुठलाही विषय त्याचा संबंध थेट आंतरराष्ट्रीय देशांशी येतो अशा सर्व बाबी केंद्र सूची मध्ये येतात. त्यातही प्रामुख्याने संरक्षण क्षेत्रातील सर्व कायदे, अधिकार सर्व प्रकारच्या सेना साठी लागणारे सर्व साधनसामग्री, दळणवळण, रेल्वे,राष्ट्रीय महामार्ग, जलमार्ग नौका मार्ग, विमानतळे, हवाई मार्ग ई.

**ब.आर्थिक घटक**:- आंतरराज्य व्यापार, विनिमय, भारतीय रिझर्व बँक, आंतरराष्ट्रीय, परराष्ट्रीय कर्जे, राष्ट्रीयकृत बँका, विमा कंपन्या, आर्थिक महामंडळे, पेटंट्स, उद्योगधंदे, खनिज संपत्ती, तेल विहिरी या सर्व घटकांचा समावेश केंद्र सूचीमध्ये अंतर्भूत केलेले आहेत.

**२..राज्य सूची**:-

राज्य सूचीतील बहुसंख्य विषय हे प्रादेशिक स्वरूपाचे व स्थानिक स्वरूपाचे आहेत. संघसूची व समवर्ती सूची या दोन्ही प्रदीर्घ व समावेशक असल्यामुळे राज्य सूचीची व्याप्ती आपोआपच मर्यादित झाली आहे. सार्वजनिक सुव्यवस्था, पोलीस न्यायदान, दुय्यम न्यायालयाची स्थापना व रचना, बाल गुन्हेगार साठी सुधारणागृह, दवाखाने, केंद्रीय विद्यापीठे सोडून इतर विद्यापीठ, मादक पेय, अपंग कल्याण संघ,संघसूचित नसलेल्या दळण-वळण साधने, निवडणुका, आमदार, मंत्री, वेतन, भत्ते, राज्य लोकसेवा आयोग इ. समावेश राज्य सूचित होतो.

**३.समवर्ती सूची** :-

केंद्र व राज्य दोघांना कायदा करता येतो. केंद्राने एखादा विषयावर जोपर्यंत कायदा केलेला नसतो तोपर्यंतच राज्याला कायदा करता येतो परंतु तो कायदा केंद्राच्या अस्तित्वात असलेल्या कायद्याशी विसंगत असता कामा नये. कायदा विसंगत नसल्यास दोन्हीच्याही अंमलात राहतात.

**अ.कायदा सुव्यवस्था संबंधित**:- फौजदारी कायदा व कार्यपद्धती, सार्वजनिक सुरक्षा, राज्यात संबंधित प्रतिबंधक स्थानबद्धता, कायदा, लवाद, दिवाणी कामाची पद्धत हे सर्व बाबी समवर्ती सूचित मध्ये येतात.

**ब.व्यक्तिगत हक्क विषयक** :- विवाह, घटस्फोट, अर्भके, अज्ञान मुले, दत्तक, जन्म-मृत्यु पत्रे, कुटुंबाची वाटणी, शेत जमीन सोडून इतर सर्व मालमत्तेच्या हस्तांतरण, निर्वासितांचे पुनर्वसन, विश्वस्त निधी इत्यादी घटकांचा समावेश व्यक्तिगत हक्कांमध्ये होतो.

**क.सामाजिक- आर्थिक क्षेत्रे** :- आर्थिक सामाजिक नियोजन, व्यापार, उद्योग, कामगार संघटना, मजदूर समस्या, सामाजिक सुरक्षितता, सामाजिक विमा, रोजगार, कामगार कल्याण, वीज, वृत्तपत्रे, पुस्तके, मुद्रानालय इत्यादी घटकांचा समावेश सामाजिक-आर्थिक क्षेत्रात येतो. या सर्व विषयावर कायदा करण्याचा अधिकार समवर्ती सूचीला आहे.

- **प्रशासकीय अधिकारांची वाटणी**

कलम २५६ ते २६३ मध्ये केंद्र-राज्य यांचे प्रशासकीय अधिकार खूप महत्त्वपूर्ण असतात कारण त्यांनी केलेल्या कायद्याची त्या-त्या क्षेत्रात अंमलबजावणी करण्याचा अधिकार असणे त्यांना कर्म प्राप्त ठरते. अर्थात दोघांमध्ये कायदे करण्याचे विषय,स्पष्ट स्वरूप, नियम हे घटनेत अंतर्भूत आहेत. परंतु समवर्ती सूचीतील विषयांच्या बाबतीत मात्र प्रशासकीय अधिकार संदर्भात कोणताही कायदा करण्याचा अधिकार केंद्र-राज्य दोघांना असला तरी अंमलबजावणीचा अधिकार मात्र सामान्य घटक राज्यांनाच असतो. केंद्र व राज्य संबंधातील प्रशासकीय संबंधात चर्चा किंवा अभ्यास करायचा म्हटल्यावर प्रशासकीय अधिकारांची १.राज्यपाल, २.नोकरशाही, ३.घटनात्मक शासन, ४.राज्य अंतर्गत स्थिरता व शांतता इ. घटकात केंद्र-राज्य संबंधाचा विश्लेषण करता येईल.

**राज्यपाल**:- कलम १५३ नुसार राज्यपाल पदाचे कार्य, महत्व सांगितले गेले आहे. केंद्र-राज्य संबंधांमध्ये समन्वय साधक, राष्ट्रपतीचा दुवा, दूत म्हणून व राज्यातील घटनात्मक शासनाचा रक्षणकर्ता म्हणून राज्यपालाचे काम करणे घटनेला अपेक्षित आहे. राज्यपालाची नेमणूक राष्ट्रपती करतात. राज्यपाल हा राष्ट्रपतीचा हस्तक, प्रतिनिधी म्हणून कार्य करतो. त्याचा कालावधी पाच वर्षाचा असला तरी केंद्रातील सरकार व राष्ट्रपतीच्या इच्छेनुसार त्याचा कालावधी राहतो. म्हणजे कालावधी संपण्याआधी त्याला राजीनामा द्यावा लागू शकतो.

**कलम ३५६**

केंद्र-राज्य संबंधांमध्ये तणाव व कटू संबंध या कलमाचा दुरुपयोग केल्यामुळे निर्माण झालेला दिसतो. या कलमाने केंद्र एखाद्या घटक राज्याचे शासन बरखास्त करण्याची क्षमता आपल्याजवळ ठेवते परंतु हे अधिकार केंद्राला असले तरी अपवादात्मक स्थितीत च केंद्राने या अधिकारांचा वापर करणे अपेक्षित होते परंतु तसे झालेले नाही. सत्ताधारी केंद्राने घटक राज्यातील विविध विरोधी पक्षाच्या सरकार पाडण्याचे काम वारंवार केलेले दिसते. स्वातंत्र्य मिळाल्यापासून १९७७ पर्यंत कॉंग्रेस पक्ष हाच मोठा व सत्ताधारी पक्ष होता. परंतु १९७५ मध्ये राष्ट्रीय आणीबाणीमुळे पूर्ण भारतभरातून कॉंग्रेसवर लोकांचा रोष वाढत गेला व नेमकी हिच संधी साधून प्रादेशिक पक्षांनी आपला जम बसविण्यास सुरुवात केली व घटक राज्य सरकारांमध्ये युती व आघाडी करून सरकारे अस्तित्वात येऊ लागले. १९७७ मध्ये कॉंग्रेसचा पराभव झाला व जनता सरकार सत्तेवर आले. या काळात एक गोष्ट झाली कॉंग्रेसवर जे आरोप विरोधी पक्ष करत होते तेच सत्तेवर आल्यावर त्याचीच पुनर्वृती हे नवीन सरकार करू लागले. थोडक्यात घटनेची पायमल्ली झाली. ज्या ठिकाणी कॉंग्रेसचे सरकार असतील ते पाडण्याचे डाव आखणे सुरू झाले. जिथे- जिथे लोकसभा सदस्य पराभूत झालेत तिथे आपले विधानसभा सदस्य निवडून येतील व आपले विधानसभेचे सदस्य संख्या वाढल्यावर राष्ट्रपती आपल्या मर्जीचा आपण निवडू शकू एवढा साधा तर्क त्या मागे होता.

१९९२ मधील बाबरी मशीद पाडल्यानंतर केंद्र शासनाने भाजपाचे मध्यप्रदेश,उत्तरप्रदेश, राजस्थान मधील सरकारे बरखास्त केली. या बर्खास्तेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने ही बडतर्फी वैध ठरवली. यामधील काही न्यायाधीशांचे असे म्हणणे होते की यामध्ये न्यायालयाने हस्तक्षेप करण्याचे आवश्यकता नसल्याचे युक्तिवाद त्यांनी केला परंतु न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळला व बडतर्फी वैध ठरवली.

**केंद्र शासनात राज्यांचा सहभाग**

केंद्र-राज्य दोघांचे परस्पर संबंध मजबूत व्हावेत व केंद्रात राज्यांना सहभागी होता यावे यासाठी राज्यसभेत राज्य विधानसभेच्या सदस्यांनी निवडलेले सदस्य असतात व हेच विधानसभा सदस्य केंद्र शासनाच्या घटनात्मक प्रमुख राष्ट्रपतीच्या निवडणुकीत भाग घेतात. राज्यांसंबंधी काही बाबींमध्ये दुरुस्ती किंवा निर्णय घ्यावयाचा असल्यास राज्यांच्या कमीत कमी अर्ध्या विधानसभा सदस्यांची परवानगी लागते. याला काही अपवाद आहेत, उदा. राष्ट्रपती पद, पदच्युतीची कारवाई कलम ३५२ आणि ३५६ यानुसार राज्याचे सरकार बरखास्त करणे. खरं म्हणजे या बाबी केंद्र-राज्य संबंधात चालना किंवा सुधारणा ऐवजी कटूता निर्माण होऊन सबंध ताणले जातात असे निदर्शनास आलेले आहे. आतापर्यंत इतिहास बघता सत्ताधारी पक्षांनी ज्या राज्यांमध्ये विरोधी पक्ष सत्तेवर आहेत त्या घटक राज्यातील सत्ताधारींना विविध अडचणी निर्माण केल्या व वेळप्रसंगी तेथील सरकार बरखास्त केले. २०२२ मध्ये महाराष्ट्रात असाच प्रकार झाला होता पक्षांमध्ये अंतर्गत बंडाळी झाली व राज्यपालांनी बहुमत ठराव घेण्याचा निर्णय घेतला. बरेच दिवस राष्ट्रपती राजवट सदृश्य परिस्थिती अस्तित्वात होती. विविध राजकीय पक्ष ,राजकीय विश्लेषक व घटनेच्या तज्ञांनी ही राज्यपालांची कृती घटनात्मक आहे किंवा नाही याविषयी बरेच वादंग निर्माण करून, संशय व्यक्त केला गेला होता अशा वेळेस घटक राज्यातील इतर पक्ष,नेते, विचारवंत व सामान्य नागरिक यांना ही ही कृती

लोकशाहीला मारक व घटनाविरुद्ध आहे अशी भावना निर्माण होते. केंद्र-राज्यामध्ये विधायक चर्चा होऊन पर्याय निघावा अशीच अपेक्षा मात्र सामान्यांना असते.

**आंतरराज्य परिषद**

कलम २६३ नुसार केंद्र-राज्य संबंध सुधारण्यासाठी व त्यात सुसूत्रता येण्यासाठी आंतरराज्य परिषद स्थापन करण्यात आली आहे. संवाद, सहकार्य व विवादांचे निराकरण करण्यासाठी ही संस्था प्रोत्साहन देते.

**राष्ट्रीय विकास परिषद**

६ ऑगस्ट १९५२ रोजी या संस्थेची स्थापना झाली. पंतप्रधानांच्या अधिपत्याखाली ही संस्था कार्य करते. राष्ट्रीय विकास परिषदेचा मुख्य उद्देश पंचवार्षिक योजनांना मंजुरी देणे व देशाच्या संतुलित विकासासाठी राज्यांच्या सहकाऱ्यांने काम करणे हे आहे. त्यामुळे केंद्र-राज्य संबंधांमध्ये दृढता व विधायक स्वरूपाचा विकास व कार्यास गतिमानता प्राप्त होते. सद्यस्थितीत नियोजन आयोगाच्या जागी नीती आयोगाची स्थापना झाली व राष्ट्रीय विकास परिषदेचे महत्त्व बदलले असले तरी ही संस्था ऐतहासिक दृष्ट्या महत्त्वाची संस्था आहे.

**निष्कर्ष**

केंद्र व राज्य पातळीवर विकासात असलेला असमतोल, राजकीय मतभेद, पक्षाशी संलग्नता आणि वैचारिक व तत्वाचा संघर्ष, स्पर्धात्मक प्राधान्यक्रम आणि धोरणे वाद-संघर्ष यास कारणीभूत ठरतात. सद्यस्थितीत भारतीय संघराज्याची रूपरेषा, स्वरूप हे सहकारी संघराज्यात वादाकडे रूपांतरित होताना दिसत आहे. सहकारी संघराज्य बळकट करण्यासाठी आर्थिक विषमतेचे उच्चाटन व आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी राज्याचे सक्षमीकरण करण्याच्या प्रयत्नांना महत्त्व प्राप्त झाले आहे. उदाहरणार्थ वस्तू सेवा कर, (GST) विकेंद्रीत नियोजनाने सहकारी संघराज्य मंच यासारख्या उपक्रमांचा उद्देश केंद्र व राज्यांमधील संवाद, समन्वय आणि सहकार्य वाढविणे हे आहे. परंतु हे उद्देश, उद्दिष्ट सरसकट सफल झालेले दिसत नाही. ध्येय धोरण राबविताना, निधी वाटप करताना व स्थानिक राज्यस्तरी विकासात समतोल साधताना केंद्रातील सत्ताधारी पक्ष विरोधातील पक्षाचे शासन किंवा सत्ता ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी निधी वाटपात दुजाभाव केला जातो असे दिसते.

भारतातील केंद्र-राज्य संबंध संघराज्यवाद, एकता व विविधतेचा तत्वांना मृत रूप देतात त्यात राष्ट्राचे लोकशाही, आचारसंहिता, बहुलतावादी समाज आणि विकासात्मक आकांक्षा प्रतिबिंबित होताना दिसतात. आव्हाने व गुंतागुंत कायम असताना घटनात्मक चौकट विकसित होणारी गतिशीलता आणि सहकारी उपक्रम भारताच्या फेडरल गव्हर्नन्स सिस्टीमची लवचिकता आणि अनुकूलता अधोरेखित करतात. संवाद एकमत निर्माण आणि सर्व समावेशक विकास धोरणांना चालना देऊन केंद्र-राज्य संबंध नागरिकांचा आकांक्षा पूर्ण करणाऱ्या आणि जागतिक स्तरावर भारताच्या वाढीस हातभार लावण्याचा शासनाच्या सुसंवादी प्रतिसादात्मक आणि प्रगतिशील मॉडेल कडे विकसित होऊ शकतात. राष्ट्रीय विकास परिषद आणि वित्त आयोगासारख्या आंतर सरकारी संस्थांना प्रोत्साहन देऊन त्यांचे

बळकटीकरण करून संसाधनाचे समान वाटप, वित्तीय शिस्त आणि सहयोगी धोरण तयार करून केंद्र-राज्य संबंध अधिकाधिक सहकार्य व समन्वयाचे निर्माण करता येवू शकतात.

**संदर्भ सूची** :-

१. भारताचे शासन आणि राजकारण :- डॉ. भा.ल.भोळे
२. भारताचे शासन आणि राजकारण :- डॉ. भा.ल.भोळे
३. Blog-https://pravinzende.co.in/2024/05explain-centerstate
४. Relation.html#google-vighnete

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*